## अर्ज निशाणी ३४ खालील आदेश
## (CNR MHSI080010922021)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०७ दि.२०/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.०७ यांचे मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. परंतू, वादी यांना न्यायालयीन कामकाजाचे ज्ञान नसल्याने त्यांना सदर बाबत माहिती उपलब्ध झालेली नाही. सदर वारस रेकॉर्डवर आणण्यास वादीने जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सदर विलंब माफ होऊन न मिळाल्यास वादीचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येऊन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करणेबाबत प्रस्तूत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०८ ते १२अ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.०७ हे दि.२०/०५/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदर दावा वादीने वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत

प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.३४ हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.३४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.३००/– (रूपये तीनशे फक्त) विधी सेवा समिती यांचेकडे जमा करावेत.

०३. प्रतिवादी क्र.०७ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.08.14 10:49:37 +0530

स्थळ : कणकवली

दिनांक : १३/०८/२०२५

(शुभम जी. लटुरिया)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.